| | | | |
|---|---|---|---|
| **MHST090040622018** | दाखल दिनांक | : | २९-११-२०१८ |
| | नोंदणी दिनांक | : | २९-११-२०१८ |
| | निकाल दिनांक | : | ०९-०७-२०२४ |
| | कालावली | : | व. म. दि. |
| | | | ०५ ०७ १० |
| **CNR. No.MHST090040622018** | | | |

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक – २९७७/२०१८ निशाणी क्रमांक – ९३

## (न्यायनिर्णय)

| |
|---|
| कोरेगांव येथील न्यादंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रमांक १, ता. कोरेगांव, जि. सातारा.<br>( पिठासण अधिकारी – चंद्रशिला शिवाजी पाटील)<br>(०९–०७–२०२४)<br>(संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २९७७/२०१८) |
| (महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ)) |

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>कोरेगांव पोलीस स्टेशन, ता. कोरेगांव, जि. सातारा. |
| **अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता** | | **श्री. एस. आय. सावंत** |
| **आरोपी** | | १. संभाजी दत्तात्रय जगदाळे,<br>वय– ४९ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>२. बळवंत बापूराव चव्हाण,<br>वय– ५७ वर्षे, व्यवसाय– शेती, |

| | | |
|---|---|---|
| | | ३. किशोर विनायक जगदाळे,<br>वय– ४६ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>४. विश्वास रामचंद्र तांबे,<br>वय– ६५ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>५. दशरथ तुकाराम चव्हाण,<br>वय– ७५ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>६. श्रीकृष्ण मुगुटराव चव्हाण,<br>वय– ३७ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>७. प्रदीप सदाशिव जाधव,<br>वय– ४७ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>८. जावेद शमशुददीन खान,<br>वय– ४५ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>९. बशीर गुलाब मणेर,<br>वय– ५० वर्षे, व्यवसाय– शेती,<br>११. जयसींग ज्ञानदेव जगदाळे(मयत),<br>१२. बाळकृष्ण जगन्नाथ लोहार,<br>वय– ६६ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>१३. सिकंदर हमजा आतार (मयत),<br>१४. समाधान अर्जुन चव्हाण,<br>वय– ३३ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>१५. प्रमोद महादेव जगदाळे, |

| | | |
|---|---|---|
| | | वय– ४८ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>१६. सदाशिव महादेव जगदाळे,<br>वय– ६२ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>१७. गणेश महादेव पुरी,<br>वय– ४२ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>१८. लतिफ हनिफ मुलाणी,<br>वय– ३२ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>१९. गणेश छगन दडस,<br>वय– १८ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>सर्व रा. कुमठे, ता. कोरेगाव, जि.सातारा |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | **श्री. एस. के. कदम** |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | ०४/१०/२०१८ |
| तक्रार दाखल दिनांक | | ०४/१०/२०१८ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | | २१/०२/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०९–०७–२०२४ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंर्दभात आदेशाचा दिनांक | | **निरंक** |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संभाजी दत्तात्रय जगदाळे,** | निरंक | फौजदारी प्रक्रिया संहिता ४१(अ) प्रमाणे नोटीस दिली. | महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) | निर्दोष मुक्तता करण्यात आली. | निरंक | निरंक |
| २. | **बळवंत बापूराव चव्हाण** | | | | | | |
| ३ | **किशोर विनायक जगदाळे,** | | | | | | |
| ४. | **विश्वास रामचंद्र तांबे** | | | | | | |
| ५. | **दशरथ तुकाराम चव्हाण** | | | | | | |
| ६. | **श्रीकृष्ण** | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुगुटराव चव्हाण | | | | | | |
| ७. | प्रदीप सदाशिव जाधव | | | | | | |
| ८. | जावेद शमशुददीन खान | | | | | | |
| ९. | बशीर गुलाब मणेर | | | | | | |
| १०. | बाळकृष्ण जगन्नाथ लोहार | | | | | | |
| ११. | समाधान अर्जुन चव्हाण | | | | | | |
| १२. | प्रमोद महादेव जगदाळे | | | | | | |
| १३. | सदाशिव महादेव | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जगदाळे | | | | | | |
| १४. | गणेश महादेव पुरी | | | | | | |
| १५. | लतिफ हनिफ मुलाणी | | | | | | |
| १६. | गणेश छगन दडस | | | | | | |

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार /बचावपक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | संदीप दत्तात्रय जगदाळे | पंच | ६६ |
| २. | सागर दिलीप भुजबळ | फिर्यादी | ६९ |
| ३. | धनंजय रामचंद्र बनछडे | तपासी अधिकारी | ७३ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी ( फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा )**

| अ. क्र. | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| | | निरंक |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ०९–०७–२०२४ )

प्रस्तुत खटला आरोपी विरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) खालील अपराधाकरीता चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२] तक्रारदार, सागर दिलीप भुजबळ पोलिस कॉ. ब.क्र. २६७७ रहिमतपूर पोलिस स्टेशन यांच्या तक्रारीनुसार, दिनांक ०४.१०.२०१८ रोजी दुपारी १४.०० वाजताचे सुमारास मौजे कुमठे, ता. कोरेगाव गावच्या हददीत हनुमान मंदीरामध्ये आडोश्याला आरोपी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी बेकायदा बिगरपरवाना यांनी दोन डावात गोलाकार बसून तीन पानी पत्याचा पैश्यावर पैज लावून नावाचा मटका खेळत व खेळवित असताना मिळून आले व आरोपीचे कब्जातून रोख रुपये १७,६८५/– व जुगाराचे साहित्य मिळून आले म्हणून फिर्यादीने आरोपींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) प्रमाणे रितसर फिर्याद दाखल केली.

३] आरोपींविरुध्द सदरचा गुन्हा अपराध क्र. २७५/२०१८ अन्वये नोंद करण्यात आला. त्यानंतर तपासिक अधिकारी एस. व्ही. गायकवाड, पो. हवा. ब. नं.१९३३, कोरेगाव पोलिस ठाणे यांनी गुन्हयाचा तपास केला व गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम १२ (अ) अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४] आरोपींविरुद्ध नि. क्र. ६३ अन्वये गुन्हयाचे प्रतिकथन नोंदवले असता आरोपींनी गुन्हा नाकबुल केला व न्याय चौकशीची मागणी केली. आरोपींनी खोटा गुन्हा असल्याचा बचाव घेतला. सदर गुन्हयातील आरोपी क्र. ११ व १३ हे मयत असल्यामुळे त्यांच्याविरूद्ध खटल्यामध्ये अवसाणीचा आदेश झाला आहे. तसेच आरोपी क्र. १० यांच्याविरूद्ध दोषारोप निश्चित न झाल्यामुळे सदर आरोपीविरूद्ध खटला हा सुरु ठेवण्यात येत आहे.

५] आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३ प्रमाणे निशाणी **७७ ते निशाणी ९२** वर निवेदन नोंदविण्यात आले, परंतु आरोपींनी अभियोग पक्षाचे संपूर्ण कथन स्पष्टपणे नाकारले व खोटी केस केल्याचा बचाव केला.

६] अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्री. एस. आय. सावंत यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. के. कदम यांचा युक्तिवाद ऐकला. न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विवेचनास उत्पन्न होतात, त्याचा निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, दिनांक ०४.१०.२०१८ रोजी दुपारी १४.०० वाजताचे सुमारास मौजे कुमठे, ता. कोरेगाव गावच्या हददीत हनुमान मंदीरामध्ये आडोश्याला आरोपी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी बेकायदा बिगरपरवाना यांनी दोन डावात गोलाकार बसून तीन पानी पत्याचा पैश्यावर पैज लावून नावाचा मटका खेळत व खेळवित असताना | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | मिळून आले ? | |
| २. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u> –**

७] प्रस्तूत प्रकरणात अभियोगपक्षाने हे शाबीत करणे गरजेचे आहे की, तक्रारीनुसार दिनांक ०४.१०.२०१८ रोजी दुपारी १४.०० वाजताचे सुमारास मौजे कुमठे, ता. कोरेगाव गावच्या हद्दीत हनुमान मंदीरामध्ये आरोपी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी बेकायदा बिगरपरवाना पत्याचा पानावर पैज लावून जुगार खेळत असताना मिळून आले.

८] अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. १ संदीप दत्तात्रय जगदाळे हा मुद्देमाल जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार असल्याचे दिसून येते. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत केली नसल्याचे दिसून येते. त्यांनी त्यांच्या जबाबात दिनांक ०४/१०/२०१८ रोजी ते कुमठे गावात हनुमान मंदीराशेजारी पोलची वायर जोडत होते त्यावेळी पोलीसांनी त्यांची एका कोऱ्या कागदावर सही घेतली. कागद कशाचा होता हे त्यांनी पाहीले नाही. त्यांचे समक्ष काहीही जप्त केले नाही अथवा कोणताही जप्ती पंचनामा केला नाही असे कथन केले आहे. अभियोग पक्षाने सदर साक्षीदारांस उत्तर सुचक प्रश्न विचारुन देखील त्यांचेकडून कोणतीही महत्वाची कबुली मिळविण्यात अभियोग पक्षास यश प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

९] अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. २ तक्रारदार सागर दिलीप भुजबळ याला

निशाणी ६९ वर तपासण्यात आले. त्याने त्याच्या जबाबामध्ये कथन केले की, दि. ०४/१०/२०१८ रोजी त्यांचे वरीष्ठ कटटे मॅडम यांनी कुमठे येथील हनुमान मंदीर येथे जुगार चालू असलेबाबत सांगीतले. त्यावेळी पो. ना. बनछडे यांनी पंचांना बोलविले व ते सरकारी वाहनाने कुमठे येथे गेले. त्यावेळी हनुमान मंदीरामध्ये १९ इसम तीन पानी पत्ते पैश्यावर खेळत होते. त्यावेळी आरोपींना जागेवर ताब्यात घेतले. तेथील पैसे, पत्ते व जुगाराचे साहित्य पंचासमक्ष जप्त केले. व त्यानंतर आरोपींविरुध्द पोलिस स्टेशनला खबर दिल्याचे सांगीतले.

**१०]** आरोपीच्या वतीने घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने हे मान्य व कबुल केले की, कटटे मॅडम यांना कोणी व काय बातमी दिली हे त्याला माहित नाही. तसेच पंचांची नावे त्याला माहित नाही. गाडीचा नोंदणी क्रमांक माहित नाही. त्याचप्रमाणे त्याला घटनास्थळाच्या चतुःसीमा सांगता येत नाहीत. सदर साक्षीदाराने पुढे असेही मान्य व कबुल केले की, जप्त केलेल्या गाडयांचे व जप्त केलेल्या मुददेमालाचे वर्णन त्याला सांगता येणार नाही. तसेच कोणाच्या ताब्यातून कोणता मुददेमाल जप्त केला याचे स्पष्टीकरणही त्याला सांगता येत नाही.

**११]** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ३ धनंजय रामचंद्र बनछडे यास निशाणी ७३ वर तपासण्यात आले. सदर साक्षीदाराने त्याच्या जबाबामध्ये तपासकार्याविषयी कथन केले.

**१२]** सदरचे सा.क्र.१ व सा.क्र.२ हे दोन्ही पोलिस साक्षीदार असून त्यांच्या जबाबातील कथनाच्या पुष्ठर्थ स्वतंत्र साक्षीदार तपासणे आवश्यक आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणातील पंच सा.क्र.१ याने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे व इतर महत्वाचे साक्षीदार तपासण्यात अभियोगपक्षाला अपयश आल्यामुळे दि. ०९.०७.२०२४ रोजी

अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे.

१३] सदर प्रकरणामध्ये अभीयोग पक्षाच्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण करता आरोपींच्या ताब्यात मुददेमाल पत्तयाची पाने व पैसे मिळून आले होते व सदर मुददेमाल पंचांसमक्ष जप्त केला होता असे कथन असले तरी सदर मुददेमाल जप्तीचा पंचनामा पंचाच्या करवी शाबीत करणे अभीयोग पक्षास अभीप्रेत होते. सदर पंचनामा ज्या तपासी अधिकारी यांनी तयार केला होता. त्यांचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही त्यामुळे आरोपी हे त्यांच्या फायदयाकरीता सार्वजनिक जागेवर जुगार खेळत होते व त्यांच्या ताब्यातून पत्याची पाने, मोबाईल,रोख रक्कम मिळून आली होती ही बाब शाबीत होत नाही.

१४] सबब, अभियोग पक्ष हा आरोपींविरुध्द गुन्हा निःसंशयरित्या शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे तक्रारीनुसार, दिनांक ०४.१०.२०१८ रोजी दुपारी १४.०० वाजताचे सुमारास मौजे कुमठे, ता. कोरेगाव गावच्या हददीत हनुमान मंदीरामध्ये आरोपी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी बेकायदा बिगरपरवाना पत्याचा पानावर पैज लावून जुगार खेळत असताना मिळून आल्याचे सिध्द होऊ न शकल्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबतः–</u>**

१५] मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षावरुन आरोपीविरूद्धचा गुन्हा शाबीत झाला नाही. परिणामी, आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. करीता, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.**१ संभाजी दत्तात्रय जगदाळे, क्र.२ बळवंत बापूराव चव्हाण, क्र.३ किशोर विनायक जगदाळे, क्र.४ विश्वास रामचंद्र तांबे, क्र.५ दशरथ तुकाराम चव्हाण, क्र.६ श्रीकृष्ण मुगुटराव चव्हाण, क्र.७ प्रदीप सदाशिव जाधव, क्र.८ जावेद शमशुददीन खान, क्र.९ बशीर गुलाब मणेर, क्र.१२ बाळकृष्ण जगन्नाथ लोहार, क्र.१४ समाधान अर्जुन चव्हाण, क्र.१५ प्रमोद महादेव जगदाळे, क्र.१६ सदाशिव महादेव जगदाळे, क्र.१७ गणेश महादेव पुरी, क्र.१८ लतिफ हनिफ मुलाणी, क्र.१९ गणेश छगन दडस** यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) या गुन्ह्यामधुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपी क्र. १० विनायक नारायण वाघ याचेकरीता सदर प्रकरण चालू ठेवण्यात येते व गुन्हयातील संपूर्ण जप्त मुद्देमाल जतन करून ठेवण्यात यावा. |
| ३. | प्रकरणात जप्त करण्यात आलेली एकूण रोख रक्कम रुपये १७,६८५/- तसेच जप्त मुद्देमाल स्लिप बुक व पेन हे आरोपी क्र. १० विनायक नारायण वाघ याचेवरील सुनावनीकरीता जतन करून ठेवण्यात यावे. |
| ४. | आरोपींनी दिलेला जामीन कदबा रद्द करण्यात येतो. |
| ५. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७- अे अन्वये र.रु. १५,०००/- चा वैयक्तिक मुचलका द्यावा. |
| *(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)* | |

कोरेगांव. **(चंद्रशिला शिवाजी पाटील)**

दि. ०९-०७-२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील न्यायनिर्णय हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखक | – श्री. एन. डी. खुस्पे |
| न्यायालय | – प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव |
| न्यायनिर्णय संक्रमित दिनांक | – ०९–०७–२०२४ |

लघुलेखक